अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र :- अतिमआ(ज)/साप्रवि/आस्था/२८९३
दिनांक :- २०/०६/२०२३

## – कार्यालय परिपत्रक –

विषय :- आरोग्य विभागाकडील ''शस्त्रक्रियागृह सहाय्यक''(वर्ग-३) (वेतनश्रेणी एस-७ २१७००-६९१००) या पदावर चतुर्थश्रेणी संवर्गातील कार्यरत कर्मचाऱ्यांमधून पदोन्नतीने नियुक्ती देणे कामी प्रारूप सेवाजेष्ठता यादी प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ :- १) शासन निर्णय पी.एम.सी. ३०१४/प्र.क्र.०२/नवि-२२, दि. २६/०८/२०१४.
२) मा. महापालिका आयुक्त ठ.क्र. १/२११ , दि. २८/१०/२०२२
३) कार्यालय परिपत्रक जा.क्र. अतिमआ(ज)/उआ(साप्र)/आस्था/७८६६, दि. १०/११/२०२२.
४) आरोग्य कार्यालय जा.क्र. एचओ/८९५, दि. ०२/०५/२०२३.

पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील '' शस्त्रक्रियागृह सहाय्यक''(वर्ग-३) या पदाकरिता बढतीने नेमणूकासाठी विहीत शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या पुणे महानगरपालिकेतील कार्यरत कर्मचाऱ्यामधून सेवाजेष्ठता, गुणवत्ता व किमान ३ वर्षाचा अनुभव असणाऱ्या सेवक/कर्मचारी यांचेमधून पदोन्नतीने नेमणूक करणे कामी संदर्भ क्र. ३ अन्वये कार्यालय परिपत्रक प्रसृत करुन अर्ज मागविण्यात आले होते. सदर प्राप्त झालेल्या अर्जामधील तपशिलानुसार तयार करण्यात आलेली प्रारुप सेवाजेष्ठता यादी पुणे महागनरपालिकेच्या **https://pmc.gov.in** या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील चतुर्थ श्रेणी संवर्गातील ज्या सेवकांची दि. ३१/१०/२०२२ अखेर शेड्युलमान्य पदावर नेमणूक करण्यात आली आहे, अशा कार्यरत असणाऱ्या सेवकांच्या नावाचा समावेश सदर सेवाजेष्ठता यादीमध्ये करण्यात आला आहे. सदर यादीतील सेवक/कर्मचारी यांनी स्वत:चे नांव, जात, जातीचा गट, शैक्षणिक पात्रता, जन्मदिनांक, नेमणूकीचे दिनांक इ. सर्व बाबींची पाहणी करुन आपल्या नावांसमोर स्वाक्षरी करावी.

सदर यादीमध्ये घेण्यात आलेल्या नोंदीबाबत काही आक्षेप/चुका असल्यास हे कार्यालय परिपत्रक प्रसिध्द झाल्याचे दिनांकापासून ०८ दिवसाचे मुदतीत आपले आक्षेप लेखी स्वरुपात, कागदपत्रांच्या पुराव्यासहीत आस्थापना विभाग, रुम नं. २४०, पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत येथे कार्यालयीन वेळेत सादर करावे. त्यानुसार पुढील ०८ दिवसांत सदरच्या नोंदी घेवून अंतिम सेवाजेष्ठता सूचीस मान्यता घेवून ती प्रसिध्द करण्यात येईल.

तसेच मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा किंवा अंतिम सेवाजेष्ठता यादी प्रसिध्द केल्यानंतर त्यामध्ये दुरुस्त्या सुचविण्यात आल्यास त्यांची दखल घेतली जाणार नाही व संबंधित सेवक/कर्मचारी यांचे शैक्षणिक अर्हतेच्या कागदपत्राबाबत तक्रार आल्यास व त्यामध्ये तथ्य आढळल्यास संबंधित सेवक/कर्मचारी यांची नेमणूक कोणत्याही टप्प्यावर संपुष्टात आणणेबाबत अलाहिदा निर्णय घेण्यात येईल.

संबंधित खातेप्रमुख यांनी या कार्यालय परिपत्रकाची समज त्यांचे नियंत्रणाखालील शस्त्रक्रियागृह सहाय्यक या पदावर पदोन्नती देणेकामी शिफारस केलेल्या महानगरपालिका प्रशासनाकडील चतुर्थश्रेणी संवर्गातील ज्या सेवकांची दि. ३१/१०/२०२२ अखेर शेड्युलमान्य पदावर नेमणूक करण्यात आली आहे, अशा कर्मचारी/सेवक यांना देणेत यावी व संबंधितांना त्याप्रमाणे अवगत करण्याची दक्षता घ्यावी.

तरी, संबंधित खातेप्रमुख यांनी वरीलबाबत जरुर ती पुढील तजवीज करावी.

Raut

(रविंद्र बिनवडे)

अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)

पुणे महानगरपालिका

16/6/2023

प्रत/-

सर्व संबंधित खातेप्रमुख/विभागप्रमुख

पुणे महानगरपालिका

यांजकडे माहितीसाठी रवाना .....

## शस्त्रक्रियागृह सहाय्यक (२५% पदोन्नती) या पदासाठी अर्ज केलेल्या पात्र सेवकांची यादी.

| अक्र | अर्ज आ.क्र दिनांक | कर्मचारी क्र. | सेवकाचे नाव | हुद्दा | वर्ग | कार्यालयाचे नाव | जातीचा प्रवर्ग | नेमणूकीचा प्रवर्ग | जात वैधता प्रमाणपत्र क्र. व दिनांक | जन्म दिनांक | प्रथम नेमणूक दिनांक | सेवानिवृत्त दिनांक | शैक्षणिक अर्हता | पहिल्या पानाचा उतारा | खाते निहाय चौकशी चालू आहे/नाही | फौजदारी गुन्हा दाखल आहे/ नाही | वर्ग-४ वर्तणुक दाखला आहे/ नाही | पात्र/ अपात्र | शेरा | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १४२३३, दि. २३/११/२०२२ | २६०१० | श्रीमती निरवणे शशिकला मंगेश | नर्सिंग ऑर्डली | ४ | आरोग्य विभाग | अराखीव | अराखीव | लागू नाही | 10-01-1978 | 19-12-2011 | 31-01-2038 | एचएससी (विज्ञान), बी. एस्सी, एमएस-सीआयटी | आहे | नाही | नाही | आहे | पात्र | | |
| २ | १४४७२, दि. २८/११/२०२२ | २६८२३ | श्री. मुजावर इक्राम इफ्तेकार | आया | ४ | आरोग्य विभाग | इमाव | अराखीव | लागू नाही | 10-12-1989 | 28-02-2013 | 31-12-2049 | एचएससी(विज्ञान), एमएस-सीआयटी, मराठी टंकलेखन (३०शप्रमि) | आहे | नाही | नाही | आहे | पात्र | | |
| ३ | १४२३२, दि. २३/११/२०२२. | २७११५ | श्रीमती खेडेकर मनिषा संदीप | मोकादम | ४ | आरोग्य विभाग | इमाव | अराखीव | लागू नाही | 04-06-1980 | 02-09-2013 | 30-06-2040 | एचएससी (विज्ञान), एमएस-सीआयटी, एएनएम कोर्स उत्तीर्ण | आहे | नाही | नाही | आहे | पात्र | | |
| ४ | १४०३१, दि. २१/११/२०२२ | २८३४४ | श्री. शिंदे अतिष नारायण | सफाई सेवक | ४ | औंध-बाणेर क्षेत्रिय कार्यालय | अजा | अजा | जोडले नाही | 20-08-1990 | 26-04-2016 | 31-05-2050 | एचएससी (विज्ञान), एमएस-सीआयटी | आहे | नाही | नाही | आहे | पात्र | | |
| ५ | १३९९४, दि. १८/११/२०२२ | २९५१५ | श्री. उदमले विशाल दत्तात्रय | सफाई सेवक | ४ | नगररोड (वडगावशेरी) क्षेत्रिय कार्यालय | अजा | अजा | २६४३९, दि. १३/०६/२००३ | 02-02-1986 | 19-09-2019 | 28-02-2046 | एचएससी (विज्ञान) | आहे | नाही | नाही | आहे | पात्र | | |

## शस्त्रक्रियागृह सहाय्यक (२५% पदोन्नती) या पदासाठी अर्ज केलेल्या अपात्र सेवकांची यादी.

| अक्र | अर्ज आ.क्र दिनांक | कर्मचारी क्र. | सेवकाचे नाव | हुद्दा | वर्ग | कार्यालयाचे नाव | जातीचा प्रवर्ग | नेमणूकीचा प्रवर्ग | जात वैधता प्रमाणपत्र क्र. व दिनांक | जन्म दिनांक | प्रथम नेमणूक दिनांक | सेवानिवृत्त दिनांक | शैक्षणिक अर्हता | पहिल्या पानाचा उतारा | खाते निहाय चौकशी चालू आहे/नाही | फौजदारी गुन्हा दाखल आहे/ नाही | वर्ग-४ वर्तणुक दाखला आहे/ नाही | पात्र/ अपात्र | शेरा | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १४५११, दि.२९/११/२०२२ | २५९८२ | श्री. सावंत राहुल काशिनाथ | रखवालदार | ४ | सुरक्षा विभाग | खुला | खुला | लागू नाही | 07-11-1980 | 26-12-2011 | 30-11-2040 | एच.एस.सी.(कला), बीए (YCM), ओटी टेक्निशियन कोर्स उत्तीर्ण | आहे | नाही | नाही | आहे | | एचएससी (विज्ञान) उत्तीर्ण नाही | |

A.V.V.

प्रशासन अधिकारी
आस्थापना विभाग
पुणे महानगरपालिका

उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका